# राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र

SHSRC Maharashtra

**महाराष्ट्र शासन**

राष्ट्रीय आरोग्य अभियान

राज्य कुटुंब कल्याण कार्यालय आवार, अॅनेक्स इमारत,दुसरा मजला
पुणे स्टेशन मागे, राजा बहादुर मिल रोड, पुणे - ४११००६
(टेलीफोन - ०२० २६०५७५०१/५१०) E-Mail: shsrc.gom@gmail.com

NHM राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र


2592

क्र. राआयंसंकें/आयएसओ मानांकन प्रमाणपत्र/ /२०१७

दिनांक -3/10/२०१७

**प्रति,**

..................................................

..................................................

..................................................

**विषय** - या कार्यालयाचे आय.एस.ओ. मानांकन ९००१:२०१५ प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यासाठी दरपत्रके मागविनेबाबत.

राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र पुणे हे कार्यालय राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत असून या कार्यालयामार्फत आरोग्यविषयक विविध योजनाचे संशोधनपर मुल्यमापन अभ्यास करून अहवाल तयार करण्याचे कामकाज करण्यात येते. या कार्यालयासाठी आय.एस.ओ. ९००१:२०१५ मानांकन प्रमाणपत्र करून घ्यावयाचे आहे.

या पत्राद्वारे राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संकेतस्थळावर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे कि, या कार्यालयासाठी आय.एस.ओ. ९००१:२०१५ मानांकन प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे करिता या क्षेत्रात कार्यरत असलेल्या संस्थाकडून दरपत्रके मागविण्यात येत आहे. सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसाचे आत (10/10/२०१७ पर्यंत) दरपत्रके कार्यालयास समक्ष अथवा पोस्टाने पोहचतील अशी पाठवण्यात यावीत याची नोंद घ्यावी.

यास्तव **अटी व शर्ती खालील प्रमाणे**

१) दर हे सर्व करांसहित नमूद करावेत.

२) विहित मुदतीमध्ये प्राप्त झालेली दरपत्रके स्वीकारण्यात येतील, अन्यथा नाकारण्यात येतील.

३) दरपत्रकावरील नमूद केलेल्या दरांमध्ये खाडाखोड अथवा अंक गिरीवलेले नसावेत..

४) दरपत्रके सीलबंद स्वरुपात थेट या कार्यालयाकडे पाठविण्यात यावेत.

५) दरपत्रकामध्ये C.S.T , VAT तसेच PAN/ PIN Number इ. नमूद करणे बंधनकारक राहील

६) दरपत्रक मंजूर झाल्यानंतर उपरोक्त नमूद केलेले आय.एस.ओ. मानांकन विषयक कामे ३ महिन्यांचे आत पूर्ण करून घेऊन तसे प्रमाणपत्र कार्यालयास उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील. प्रसंगी या प्रकरणी कर्मचार्यांना अडचणी उद्भवल्यास संस्थेच्या प्रतिनिधीने वेळोवेळी

कार्यालयामध्ये समक्ष उपस्थित राहून कागदपत्रांची पूर्तता विहित मुदतीत करून घेण्याची जबाबदारी आपली राहील. प्रमाणपत्र ३ महिन्याचे आत उपलब्ध न करून दिल्यास परचेस मन्युअल ऑफ स्टोर मधील तरतुदीनुसार दंडात्मक कार्यवाही केली जाईल.

७) दरपत्रकाना प्रतिसाद न मिळाल्यास अथवा त्यामध्ये काही त्रुटी आढळून आल्यास, हि दरपत्रके (नोटीस) प्रक्रिया स्वीकारणे, नाकारणे अथवा रद्द करणे इ. अधिकार मा. कार्यकारी संचालक यांना रहातील

तसेच संबंधित कामकाजाबाबत अंतीम निर्णय घेण्याचे अधिकार सर्वस्वी मा. कार्यकारी संचालक यांचे रहातील याची नोंद घ्यावी.

कार्यकारी संचालक
राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र पुणे